Vol 5 Issue 12 September 2016 ISSN No : 2249-894X

## Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 12 | September - 2016

Review Of Research

# पारंपरिक लोकरूढी विधीतील रंगाविष्कार

श्री. विनोद सुर्यभान ढोबळे[1] , डॉ. एन. डी. चौधरी[2]
[1]कडा. ता. आष्टी जि. बीड.
[2]मराठी विभाग प्रमुख व सहयोगी , प्राध्यापक संशोधक मार्गदर्शक , आनंदराव धोंडे महाविदयालय कडा , ता. आष्टी जि. बीड.

## प्रस्तावना :-

मनुष्य जेव्हा समुह करून राहू लागला तेव्हा प्रत्येकास जीवन जगण्यासाठी काही घटकांची गरज भासू लागली ज्याला आपण लोकजीवन मानतो, ते सिध्द होण्यासाठी या घटकांची आवश्यकता होती. लोकजीवन परंपरा, रूढी, समजुती श्रध्दा, विधी याद्‌वारे व्यक्त होत असते याला आपण लोकजीवन मानतो. सण, उत्सव, राहणीमान , रीतीरिवाज आचार विचार, भाषा यादवारे संस्कृती सिध्द होते. या सर्व घटकाची मिळून लोकसंस्कृती आपण मानत असतो. लोकजीवन सतत प्रवाही असते. ते परिवर्तनशील असते. मुळातच मनुष्य नव्याचा भुकेला असतो. जीवनात बदल घडवणे हा मनुष्याचा स्वभाव असतो. समाजातील परिवर्तन कधी सहजपणे घडत असते. तर कधी परिस्थितीमुळे घडते. लोकसंस्कृतीतील कालबाहय बाबी मनुष्य टाकून नव्याचा स्वीकार करत असतो. समाजात पारंपरिक काही बाबी लोकसमुहाची जीवन पध्दती व्यक्त करत असतात. लोक जीवनातील परंपरेने चालत असलेल्या बाबी जीवनाचे अंग असतात. यातील श्रध्दा मानवी जीवनाचा भाग असतात. या वरून समाजातील परिवर्तनाचे अखंड चक्र लक्षात येते. याचाच अर्थ असा की समाजातील लोक समुहाचे वेगवेगळे गृह निर्माण होऊन परंपरा आणि देवता अशा तत्वामुळे समाजाची विभागणी होऊ लागते.

समाजातील परिस्थितीच्या रेटयामुळे मानवी जीवनात परिवर्तन घडू लागते. हे बदल दोन संस्कृतीच्या आदान प्रदानामुळे, संस्कृतीतील काही घटकांच्या प्रभावामुळे किंवा आपल्या संस्कृतीतील उणीव दूर करण्यासाठी एका संस्कृतीतील लोक स्वीकारत असतात. दोन संस्कृतीतील समन्वय सहजासहजी घडत नाही. संस्कृतीतील संघर्षात जीत आणि जेते असेच रूप असते ती संस्कृती प्रभावहीन असते जी प्रभावी संस्कृतीतील विशेष स्वीकारत असते.



“जेव्हा एखादा समाज एका विचार विश्वातून दुस.या विचार विश्वात जातो. त्यावेळी त्याच्या सगळया जीवन रीतीतच बदल होतो. अव्वल इंग्रजीच्या प्रभावामुळे भारतीय समाजात बदल झाला[1]”.. डॉ. प्रभाकर मांडे यांच्या मतानुसार इंग्रजी संस्कृतीचा परिचय झाला. या संस्कृतीतील प्रभावशील तत्वे भारतीय संस्कृतीने स्वीकारले. यामुळे भारतीय संस्कृतीत परिवर्तन घडू लागले. हे परिवर्तन विशिष्ट पातळीपुरते मर्यादित होते. पाश्चात्य साहित्याच्या परिचयामुळे वैज्ञानिक दृष्टीचा परिचय झाला. मध्ययुगीन काळात जीवन पध्दतीचे धर्म हे केंद्र होते. औदयोगीकरणामुळे नागरीकरण वाढले. नवीन शैक्षणिक प्रणाली मुळे जीवनच ढवळून निघाले. संस्कृतीचा प्रभाव आणि अनुकरणामुळे बदल झाला. पारंपरिक जीवन पध्दतीला परिस्थितीच्या रेटयापुढे परिवर्तनशील बनावे लागले. परंपरेने प्रचलित असलेल्या काही बाबी बदललेल्या आपल्या दृष्टीस पडतात. जुने नाहिसे होऊन समाजात नव्याची नवलाई रूजू लागली.

संस्कृतीतील पारंपरिक बदल सहजपणे घडुन येतात. हे बदल होऊ लागलेले समाजाच्या लक्षात येत नाहीत. काही समाजात समुहामध्ये असे बदल काही कारणांनी होतात. तर काही समुहामध्ये परंपरेत दीर्घकाळ बदल होतच नाहीत. यावरून आपणास असे लक्षात येईल की समाजातील जीवन पध्दतीत वेगवेगळे स्तर निर्माण होतात. यांनाच आपण नागरी, ग्रामीण आणि आदिवासी असे मानतो. नागर यांच्या परिवर्तनशील जीवन पध्दतीचा प्रभाव ग्रामीण समाजावर पडतो. ग्रामीण भागातील व्यक्तीचे नागरी जीवनाशी संबंध प्रस्थापित होतात. त्यामुळे ग्रामीण नागरी होतात तसे आदिवासी सहजासहजी नागरी होत नाहीत. असे असले तरी या तीनही स्तरात परंपरेने चालत आलेल्या परंपरा, रूढी, विधी, समजुती असतात. नागरी समाजातील, या रूढी, परंपरा प्रथा, विधी, जीवनाचा भाग मानल्या जातात. ग्रामीण आणि आदिवासी यांच्या जीवनाचे अंग जसे असतात. तसे नागरी जीवनात आढळत नाही. नागरी जीवनात या पारंपरिक बाबी परिवर्तनशील रूपात स्वीकारल्या जातात. या बाबीच्या आतला गाभा कायम ठेवून बाहयांगामध्ये परिवर्तन प्रभावीपणे घडून आलेले आढळते.

लोक जीवनात परंपरेने चालत आलेल्या रूढी, विधी जीवनाचे अंग असतात. या रूढी विधी कधी सुरू झाल्या हे सांगणे कठीण जाते. पण लोकजीवनात कुलाचार, सण ऊत्सव प्रसंगी प्रगटीकरण समुहाकडून केले जाते. याचे सविस्तर विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

रूढी विधी परंपरेने चालत आलेल्या काही

रूढी समाजात प्रचलीत असलेल्या आढळतात. या रूढी समाजात स्थिर असतात. त्यातील काही रूढी खालील प्रमाणे.

1.रूईच्या झााडाशी लग्नाची रूढी.
2.दशक्रीया विधी वेळी मंत्राग्नीची रूढी.
3.वनवासाची रूढी.
4.लक्ष्मण शक्तीची रूढी.
5.पाऊस मागण्याची रूढी.
6.जोगवा मागण्याची रूढी.

वरील रूढी समाजात कमी अधिक प्रमाणात आढळतात. प्रदेश परत्वे यांच्या आविष्कारात बदल आढळत असला तरी रूढीतील उद्देश मा़त्र सारखाच असतो. समाजातील काही पुरूषांच्या पहिल्या दोन पत्नीचा मृत्यू झालेला असेल, त्याला तिसरे लग्न करायचे असेल तर प्रथम त्याचा विवाह रूईटीच्या झाडाशी लावला जातो. विवाह विधी वेळी पार पाडले जाणारे सगळे विधी सोपस्करपणे येथेही पारपाडलेले आढळतात. वास्तविक हे नाटक असते. क्रमाणे तिसरी मृत्यू पावू नये म्हणून ही रूढी पाळली जाते. एखादी व्यक्ती मृत पावली तर त्या व्यक्तीचे अंत्यसंस्कार भडाग्नी देवून केले जाते. वास्तविक भडाग्नी वेळी मंत्राग्नी न देता आल्यामुळे दशक्रीया वेळी अस्थिला शरीर मानून अस्थी गोव. यावर ठेवून मंत्राग्नी दिला जातो. अंत्यसंस्कार वेळी पाण्याने भरलेले मडके खांदयावर ठेवून फे.या मारण्याची रूढी पार पाडली जाते. जणू काही व्यक्तीच्या शरीरालाच अग्नी देत आहोत असे दर्शवले जाते.

ग्रामीण समाजात श्रावण महिन्यात पोथ्या वाचल्या जातात. काही ठिकाणी भावार्थ रामायणाची पोथी लावली जाते. रामायणातील अरण्यकांड सुरू होताना गावातील भाविक वनवासाला निघतात. अंगावरील कपडयांना भगवा रंग देवून किंवा पोत्याच्या बोंदरीचा पोषाख अंगावर परिधान करून चौदा दिवस गावोगाव फिरतात. रस्त्याने तीर्थ दर्शन घेतात प्रभू रामचंद्र चौदा वर्षे वनवासात होते. तसे हे वनवासी चौदा दिवस भटकंती करून समर्थन करतात. यामागे जीवन समृध्द व्हावे गावावर संकटे येवू नयेत. दुष्काळ पडू नये. अशी समजूत असावी. रामायण ग्रंथातील प्रमुख आत्मा म्हणजे लक्ष्मण शक्तीचा प्रयोग होय . ग्रंथाचे पठण आणि कथन अशा उत्स्फुर्ततेने केले जाते की यातून प्रसंगनिर्मिती केली जाते. लक्ष्मणाला शक्ती लागणे, रामाचा विलाप, हनुमानाकडून द्रोणागिरी आणणे या घटना आवाजाच्या चढ उतारात, कधी भावूक होउन कथन करून कथेत आणि आविष्कारात आवेश निर्माण केला जातो. ग्रामीण जीवन पध्दतीत जसे निसर्गाला प्राधान्य असते. तसे पावसाला अत्यंत महत्व दिले जाते. पाऊस वेळेवर पडला नाही पावसाने ओढ दिली तर पाऊस मागण्याची रूढी गावोगाव आढळते. ही रूढी परंपरेने चालत आलेली आहे. गावातील लोक एकत्र येउन टाळमृदंगाच्या ठेक्यात भजन म्हणत गावच्या शिवेवर जातात. गावातील कुंभाराने घागर दिली, कोळयाने पाण्याने भरून घेतली. परटाने चाफयाच्या फुलांची माळ घागरीला घातली, लोहाराने कु.हाड दिली कधी लोखंडाचा तुकडा वापरला जातो. हे सर्व साहित्य घेवून गावचा पाटील कुलकर्णी यांना सोबत घेवून शिवेवर पावसाची पुजा केली जाते.

"परंपरेने रूढ असलेल्या आणि ग्रामीण भागात सजीवावशेषरूप असलेल्या नाटयमय रूढींच्या मध्ये पाऊस मागण्याची रूढी वैशिष्टयपूर्ण आहे".

डॉ. मांडे याचे मतानुसार आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कोणी पाऊस मागण्यासाठी जात नाहीत. लोक साहित्यात पाऊस मागण्यासाठी लहान मुली एकत्र येतात. गायीच्या शेणापासून उंबरासारखी भुंडी बनवतात. त्यावर हळद कुंकु टाकून घरोघर गाणी म्हणत फिरतात. पाऊस मागतात ज्या घरासमोर जातील तेथील लोक त्यांचे अंगावर पाणी मारतात. त्याखालीलप्रमाणे गाणी म्हणतात.

भुंडी बाई भुंडी, भुंडी गेला शेता
पाऊस आला मोठा
येउंदया बाई येंउदया दानं राळं पिकू दया
भुंडी बाई भुंडी गेली शेता
पाऊस आला मोठा
भुंडीच्या भाकरी भिजल्या
भिजूंदया बाई भिजूंदया
आमच्या कण्या शिजूंदया
शिजुंदया बाई शिजूंदया
कणगी दानं भरू दया.

अशी पाऊस मागण्याची रूढी समाजात प्रचलीत होती. आजच्या आधुनिक युगात पाऊस मागण्यासाठी महादेवाच्या मंदिरातील गाभा.यात पाणी ओततात. कोणी दूध ओततात. या संदर्भात लोक कथा प्रचलित आहे.

एका राज्यात दुष्काळ पडला राजानं दंवडी दिली. सर्वांनी महादेवाच्या गाभा.यात ओतण्यासाठी दूध आणावे. संपूर्ण नगरीतील लोकानी गायी म्हैशीच्या वासरांना, घरच्या लहान पोरांना दूध न पाजता गाभा.यात ओतले, पण गाभारा भरला नाही. राजाला वाईट वाटले. आता गाभारा भरत नाही म्हणजे नगरीतील असा कोणताच श्रेष्ठ भक्त नाही की तो गाभारा भरू शकेल. जर गाभारा भरला नाही तर गावावरील संकट कसे दूर होईल. तेवढयात एक वृध्द म्हातारी हातात छोटी लोटी दूध घेवून आली लोकांनी तिला पाहिले, लोक तिला म्हणू लागली की आम्ही एवढे दूध ओतले तरी गाभारा भरला नाही. तुझ्या लोटीभर दुधाने काय होणार म्हातारीने यांच्या बोलण्याकडे लक्ष न देता दूध गाभा.यात ओतले. काय आश्चर्य गाभारा भरून गेला लोकांना नवल वाटले. जो तो म्हातारीला विचारू लागला तेव्हा म्हातारीने त्यांना उत्तर दिले की मी गायी म्हैशीच्या वासरांना, घरातील लेकरांना भरपुर दुध पाजून उरलेले येथे आणले, लोकजीवन श्रद्धेने भरलेले आहे. आजही ग्रामीण भागातील स्त्रिया आणि पुरूष जेजूरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी यांना नवस करतात. रविवार, मंगळवारचा उपवास करतात. उपवासाचे दिवशी पाच घरे जोगवा आणि वारी मागतात. ही रूढी पाचवारा पुरती मर्यादित असते. या देवतांचे भगत नेहमी जोगवा

वारी मागतात.

लोक जीवनात रूढी बरोबर काही विधी प्रचलीत असलेले आढळतात. लोक संस्कृतीत देवदेवता हा महत्वाचा घटक मानला जातो. श्रद्धेने लोक देवदेवतांना भजतात. आपल्या परीने भक्ती करतात. पण लोकजीवनात याबरोबर काही विधी प्रचलित असलेल्या आढळतात. देवदेवतांचे विवाह सोहळे वृक्षांचे विवाह प्रचलित असलेले आढळतात. देवदेवतांचे विवाह सोहळे, वृक्षांचे विवाह, प्राण्याचे विवाह अगदी मनुष्यासारखे पार पाडले जातात.

"औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यात बाबरे या गावी श्री व्यंकटेशाचा म्हणजेच बालाजीचा लग्न सोहळा होतो[3]". श्रावणी अमावस्येला बैलपोळा सण साजरा केला जातो बैलांना सजवून मिरवणूक काढतात. मिरवणूकीनंतर लग्न लावतात. दिपावली नंतर तुळशीविवाह घरोघर पार पाडला जातो. या सर्व विवाहविधीमध्ये मूळ विवाहविधीचे सोपस्कर पार पाडले जातात. या वरून संपूर्ण महाराष्ट्रात कमी अधीक प्रमाणात परंपरेने चालत आलेल्या रूढी विधींचा रंगाविष्कार पहायला मिळतो.

सारांशः लोक संस्कृतीत अशुभाचे निवारण, मनोरंजन, प्रबोधन, उद्‌बोधन महत्वाचे असते. अलौकीकाचे लौकीकीकरण करून काही रूढी विधी समाजात प्रचलित असलेल्या आढळतात. आजही देवदेवता अशा रूढीविधी प्रसंगी उपस्थित होतात. अशी लोकांची श्रध्दा असते. समाजातील कुलाचार पार पाडताना देवता कार्यस्थळी आवाहन केल्यानंतर येतात अशी भावना भक्ताची असते. परंपरेने चालत आलेल्या या बाबी समाजातील लोक किती ही उच्च शिक्षित झाले तरी श्रध्देने रूढीविधी पाळतात असे आपल्या लक्षात येते. आधुनिक काळात या रूढीविधीत काही अंशी बदल झाला असला तरी तो बदल अंतर्गत गाभ्यातील नसून बाहयांगातील स्वरुपात होत असतो. म्हणुन प्रगत लोकांमध्येही किती तरी रूढीविधी आजही प्रचलित आहेत. त्यातील भाव जोपर्यत विश्वास आहे तो पर्यंत असाच टिकून राहणार आहे यात शंका नाही.

### *संदर्भ सूचि-*

1.लोक रंगभूमी डॉ. प्रभाकर मांडे पृष्ठ 14
2.लोक रंगभूमी डॉ. प्रभाकर मांडे पृष्ठ 16
3.लोक संस्कृतीचे उपासक डॉ. रा. चि. ढेरे पृष्ठ 26

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com